# जिल्हा परिषद - अहिल्यानगर
## ग्रामिण पाणी पुरवठा विभाग
## <u>ई – निविदा नोटीस</u>

---

जिल्हा परिषद अहिल्यानगर मार्फत जुनी व निरुपयोगी मोटारवाहने व यंत्रसामग्री निविदेत नमूद केलेल्या ठिकाणी आहे त्या स्थितीत जेथे आहे तेथे व जशी आहे तशी या तत्वावर ई – निविदा पध्दतीने लॉटनिहाय विक्री करावयाची आहे.

सदर ई – निविदा सविस्तर अटी व शर्ती व संपुर्ण माहिती शासनाच्या [www.mahatenders.gov.in](http://www.mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आले आहे. निविदा कालावधी दिनांक / / २०२६ रोजी दुपारी पासुन दिनांक / / २०२६ रोजी दुपारी वाजेपर्यंत आहे.

वरिल जाहिराती संदर्भातील पुढील सर्व माहिती, सुधारपत्रक, शुध्दीपत्रक नियत तारखेतील विस्तार (काही असल्यास) हे वरील वेबसाईटवरच प्रदर्शित करण्यात येतील. निविदेच्या सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

स्वाक्षरी/-
कार्यकारी अभियंता
ग्रामिण पाण पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, अहिल्यानगर.

स्वाक्षरी/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, तथा
अध्यक्ष लिलाव समिती, अहिल्यानगर

**AHILYANAGAR ZILLA PARISHAD**
**RURAL WATER SUPPLY DIVISION AHILYANAGAR**

| ACTIVITY | | DATE |
|---|---|---|
| 1 | Date of tender release & uploading NIT and Tender Documents (Online) | **As Per Online Schedule** |
| 2 | Last date of downloading & submission of Technical & Financial Proposals (online) | |
| 3 | Date of Opening of Technical Bid (Online) | |
| 4 | Date of uploading of list of Technically qualified Bidders (Online) | |
| 5 | Date of opening of Financial Bid (Online) | |
| 6 | Date of uploading of List of Financial Qualified Bidders (Online) | |

NOTE: Days mean working days excluding Saturdays, Sundays and Government Holidays Date of openings of technical / Financial bids are probable if change occurs the corrigendum will published accordingly. **Above date and time of uploading documents may be change it necessary.**

1. The complete bidding process will be online (E – Tendering) The guidelines to download the tender documents and online submission of bids and procedure of tender opening can be downloaded from website **www.mahatenders.gov.in** as per schedule of dates given as above. as per online schedule.
2. Tenderer should submit 1) Tender Form Fees Rs. 590/- and 2) E.M.D. of 10000/- for Mention Lot in **SBI** A/c No. 33991302872 Burudgaon Road Branch, Ahilyanagar.
3. Please Mention Scrap rates in per kg. Please Mention Rates for Lot
4. All documents should be submitted as per online schedule.
5. All document submitted shall be same as per the scanned copies submitted in Envelope No. 1 (i.e. envelope of Technical documents) Online while uploading Tender Bid.
6. The Technical Bids will be opened online as per scheduled and date as maintained above in the office of the **"Executive Engineer, Rural Water Supply Division, Zilla Parishad, Ahilyanagar".**
7. The Financial Bids will be opened online as per the scheduled date and time as give above from website **www.mahatenders.gov.in** in the office of the **"Executive Engineer, Rural Water Supply Division, Zilla Parishad, Ahilyanagar".**
8. Any change in the Scheduled or Activity will be published on website **www.mahatenders.gov.in**.
9. The Tenders submitted by the Tenderer shall remain valid for the period of 120 days from the date opening of tenders for the Final Sanction.
10. The Tenderer should note that the E.M.D. of Accepted Tenderer will be with Zilla Parishad until Tender Process Completes. & E.M.D. of Rejected Tenderer will be Returned.
11. Tenderers can submit Rates with E.M.D. seperately is Compulsory. After opening financial bid Rates above the "Upset Price" decided by Auction Committee will be Accepted.
12. **Inadvertent typewriting errors in tenders or advertisements cannot be exploited.**

**sd/-**
**Executive Engineer**
**R.W.S. Div, Zilla Parishad, Ahilyanagar**

**sd/-**
**Chief Executive Officer**
**Zilla Parishad Ahilyanagar**

# जिल्हा परिषद - अहमदनगर
## ग्रामिण पाणी पुरवठा विभाग
## जुनी व निरुपयोगी मोटार वाहने व यंत्रसामुग्री ई – निविदा नोटीस

**जिल्हा परिषद अहिल्यानगर अखत्यारित असलेली जुनि व निरुपयोगी मोटारवाहने, यंत्रसामुग्री निविदेत नमुद केलेल्या ठिकाणी आहे त्या स्थितीत जेथे आहे तेथे व जशी आहे तशी या तत्वावर जास्तीत जास्त किंमतीला विक्री करावयाची आहे. त्यासाठी ई – निविदा मागवत आहे.**

| अनु. क्र. | लॉट क्रमांक | लिलाव करावयाच्या सामग्रीचा तपशील / वर्ष | को-या निविदा फॉर्मची किंमत रुपये | इसारा / बयाना रक्कम प्रत्येक लॉटसाठी | लॉटचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | **4** | **M & M Diesel Jeep BOLERO MH16-N-0582**<br><br>AS PER **B.O.Q** (ATTACHED SEPARATELY) | **रुपये ५९०/- मात्र** | १००००/- | उपअभियंता (यांत्रिकी) कार्यशाळा, “केडगांव देवी” नगरपुणे महामार्गावरील हॉटेल अर्चना पासुन केडगांव ते नेप्ती रस्ता , यांत्रिकी उपविभाग जिल्हा परिषद अहमदनगर |

### निविदाची संक्षिप्त माहिती :-

१) **वरिल नमुद वाहन / यंत्रसामुग्रीचे निविदा प्रक्रिया (ई – निविदा) संगणकावर ऑनलाईन करणेत येईल या निविदा संबंधीत सर्व माहिती व पुढील सर्व सुचना व शुध्दीपत्रके इत्यादी इंटरनेटद्वारे ऑनलाईन प्रसिध्द करणेत येतील.**

२) सदर बाबतची सविस्तर माहिती व निविदा अटी व शर्ती **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर पाहता येईल व डाऊनलोड करता येईल. त्यासाठी निविदा फॉर्मची किंमत मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांचे स्टेट बँक ऑफ इंडिया बुरुडगांवरोड शाखेतील खाते क्रमांक ३३९९१३०२८७२ या खात्यात ऑनलाईन पध्दतीने भरणा करावे.

३) निविदा प्रपत्र ‘अ’ (Bid) **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दिलेल्या ऑनलाईन वेळापत्रकाच्या कालावधीतच भरता येतील.

४) इसारा रक्कमेचा भरणा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर या स्टेट बँक ऑफ इंडिया बुरुडगांवरोड शाखेतील खाते क्रमांक ३३९९१३०२८७२ मध्ये स्वतंत्ररित्या ऑनलाईन पध्दतीने भरणा करावेत. मंजूर होणा-या लॉटची इसारा रक्कम निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत जि.प.च्या ताब्यात राहील. मंजुर निविदाधारकास संबंधीत लॉटची संपूर्ण रक्कम भरणा करावी लागेल. निविदा प्रक्रिया पुर्णझालेनंतर इसारा रक्कम स्विकृत निविदाधारकाच्या खात्यावर ऑनलाईन परत केले जाईल. नामंजूर लॉटची इसारा रक्कम ऑनलाईन संबंधीतांस परत केली जाईल.

५) वर नमुद लॉटचे दर स्पष्टपणे नमुद करावेत. वर नमुद लॉट वजनावर असेल तर प्रतिकिलोचे दर स्पष्टपणे नमुद करावेत.

६) तांत्रिक लिफाफा ऑनलाईन पध्दतीने ऑनलाईन शेडयुल प्रमाणे **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, अहिल्यानगर येथे उघडले जातील. (शक्य असल्यास)

७) निविदा अटी / शर्ती व निविदा दाखल करण्याचे वेळापत्रक इत्यादी माहिती उपरोक्त संगणकीय संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

८) कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांनी राखुन ठेवला आहे.

९) काही कायदेशीर बाबी निर्माण झाल्यास अहमदनगरच्या न्यायालयीन कक्षेत हाताळण्यात येतील. निविदा किंवा जाहिरातींमध्ये अनवधानाने टंकलेखन त्रुटींचा गैरफायदा घेतला जाऊ शकत नाही.

१०) वाहनांच्या किंमती व त्यावरील देय असलेले सर्व प्रकारचे कर, आर.टी.ओ. कर वाहन हस्तांतरणावेळी लागणारे सर्व प्रकारचे कराची रक्कम हे लॉट मंजुर / स्विकृत झालेनंतर निविदाधारक/लिलावधारकाने तात्काळ भरुन वाहन हस्तांतरण केलेनंतरच सदरचा लॉट ताब्यात देण्यात येईल, जिल्हा परिषद कुठल्याही प्रकारचे देय रक्कम हस्तांतरणावेळी भरणार नाही. प्रादेशीक परिवहन कार्यालयाकडील सर्व प्रकारची देय रक्कम हे स्विकृत लिलावधारकाने भरावयाचे आहे, या अटीचे पालन करुनच जाहीर ई निविदेमध्ये सहभाग घ्यावयाचा आहे. त्यासंबंधी कुठल्याही प्रकारचे कायदेशीर / न्यायालयीन बाबीचा अधिकार लिलावधारकाला राहणार नाही.

११) जेथे आहे तेथे व जशी आहे तशी या तत्वावर सदर यंत्रसामुग्री मोटारवाहने विक्री करावयाची आहे. निविदा धारकाने निविदेत नमुद केलेल्या ठिकाणी निरुपयोगी मोटारवाहने / यंत्रसामुग्री पाहुन जास्तीत जास्त दर नमुद करावेत नंतर तक्रार चालणार नाही. नमुद मोटारवाहने / यंत्रसामुग्री "केडगांव देवी" नगरपुणे महामार्गावरील हॉटेल अर्चना पासुन केडगांव ते नेप्ती रस्ता येथील उपअभियंता (यांत्रिकी) कार्यशाळा, केडगांव येथे पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**स्वाक्षरी/-**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद तथा,**
**अध्यक्ष लिलावसमिती, अहिल्यानगर**

# जिल्हा परिषद - अहिल्यानगर
## जुनी व निरुपयोगी मोटारवाहने व यंत्रसामुग्री
## लिलावाचे विक्रीबाबतचा ई – निविदा फॉर्म

**निविदा धारकाचे नांव व पत्ता:-** ______________________________

______________________________

______________________________

**को-या निविदा फॉर्म ची किंमत रुपये – ५९०/-**

**निविदा फॉर्म विकल्याचा दिनांक        /      / २०२६**

जिल्हा परिषद अहिल्यानगर मार्फत जुनी व निरुपयोगी मोटारवाहने व यंत्रसामुग्रीचा ई – निविदाद्वारे विक्री करण्यासाठी इच्छुक खरेदीदारांनी त्यांच्या लिलावाच्या जास्तीत जास्त दरांच्या ई – निविदा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर हे या सोबतच्या विहीत **प्रपत्र अ (BOQ)** मध्ये मागवीत आहेत.

१. निविदा अटी व शर्ती **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध राहतील. निविदा अटी व शर्ती या दिलेल्या ऑनलाईन वेळापत्रकाच्या कालावधीतच डाऊनलोड करता येतील. त्यासाठी निविदा फॉर्मच्या किंमतीचा भरणा मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांचे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा बुरुडगांवरोड, अहिल्यानगर या राष्ट्रीयकृत बँकेतील खाते क्रमांक ३३९९१३०२८७२ यामध्ये स्वतंत्ररित्या भरणा करुन ती पावती स्कॅन करुन अपलोड करावी.

२. निविदा धारकांनी निविदा फॉर्मची किंमत व बयाना रकमेचा भरणा मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांचे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा बुरुडगांवरोड, अहिल्यानगर या राष्ट्रीयकृत बँकेतील खाते क्रमांक ३३९९१३०२८७२ यामध्ये करावा.

३. सदर ई – निविदा महाराष्ट्र शासनाच्या **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दिलेल्या ऑनलाईन वेळापत्रकाच्या कालावधीतच सादर करता येईल.

४. ज्या निविदा धारकाची निविदा रक्कम सदर नमुद लॉटचे निर्धारीत वाजवी किंमत ( Upset Price ) पेक्षा जास्तीत जास्त असेल तीच निविदा स्वीकृतीस पात्र राहील.

५. **निविदा सादर करण्याची पध्दती:-** ई – निविदा दोन लिफाफे पध्दतीने सादर करणे आवश्यक आहे.

**(अ) लिफाफा क्र.१**

निविदा धारकाचे पॅनकार्ड व आधारकार्ड किंवा इलेक्शन कार्ड / निविदा फॉर्म फी / लॉटची बयाना रक्कम आणि निविदा धारकाचे जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र त्याचप्रमाणे ई – निविदेसोबत जोडलेली (अपलोड केलेली) सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट - १) रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर लिफाफा क्र. १ मध्ये जोडणे निविदाधारकास बंधनकारक आहे.

**कंत्राटदाराने ई – निविदा सादर करतांना वैधानिक लिफाफयातील कागदपत्रे अपलोड करण्यापुर्वी स्वतः कागदपत्रांवर पान क्रमांक / एकूण पाने (उदा. १/६७) अशा पध्दतीने सर्व पाने क्रमांक टाकून पृष्ठांकित करुन पीडीएफ फाईल लिफाफा क्र. १ मध्ये अपलोड करावी. अपलोड करण्यात येणा-या कागदपत्रांवर पृष्ठ क्रमांक नमुद नसल्यास सदरची निविदा ग्राहय धरण्यात येणार नाही.**

**(ब) लिफाफा क्र.२ प्रपत्र अ ( BOQ )**

निविदाधरकाने सोबतच्या विहित प्रपत्रात ( BOQ ) जुनी मोटारवाहने व यंत्रसामुग्री चे ज्या लॉटसाठी इसारा रक्कम भरले त्याच लॉटसाठी जास्तीत जास्त किंमतीचे दर भरुन अंकी व अक्षरी नमुद करावेत व निविदा अटी व शर्ती मान्यता दर्शक स्वाक्षरी सदर निविदा फॉर्मच्या प्रत्येक पानावर करुन इतर आवश्यक ठिकाणी स्वाक्ष-या कराव्यात व संपूर्ण निविदा फॉर्म अपलोड करावा.

**६. निविदा उघडण्याची पध्दत :-**

निविदा उघडते समयी प्रथम निविदाचा पहीला लिफाफा उघडण्यात येईल, पहिल्या लिफाफ्यात पॅनकार्ड, निविदाधारकाचे जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र, व अॅड्रेस प्रुफसाठी आधार कार्ड किंवा इलेक्शन कार्ड,

निविदा फी व संबंधीत लॉटची बयाना रक्कम त्याचप्रमाणे रु. ५००/- च्या स्टँम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र (हमीपत्र) (परिशिष्ट १) ही सर्व कागदपत्रे भरलेले असल्यास त्या निविदा धारकाचा लिफाफा क्र. २ (व्यापारी लिफाफा) उघडण्यात येईल सदरहु पुर्तता केलेली नसल्यास त्या निविदाधारकांचा निविदा लिफाफा क्र.२ उघडला जाणार नाही.

## ७. निविदा अटी व शर्ती :-

१) कोणतीही अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्विकृत करणेचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राखुन ठेवलेला आहे.

२) निविदाधारक एक किंवा त्यापेक्षा अधिक लॉटससाठी निविदा भरु शकतील. प्रत्येक लॉटनिहाय इसारा रकमेचा भरणा केलेले लॉटचे दर ग्राहय धरण्यात येतील.

**निविदा उघडलेनंतर जिल्हा परिषद लिलाव समितीने अंतीम केलेल्या निर्धारित वाजवी किंमतीपेक्षा जास्त असलेले लॉटनिहाय दर स्वीकृत केले जातील. त्यानुसार निविदाधारकांनी समक्ष लॉटची पाहणी करुन दर नमूद करावेत.**

३) सदर निविदांच्या अटी व शर्ती शिथिलक्षम करण्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर हे सक्षम आहेत. निविदा अटी व शर्तीबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांचा निर्णय अंतिम राहील व तो निविदाधारकांवर बंधनकारक राहील.

४) सदरहु निविदा प्रक्रिया फक्त जिल्हा परिषद, अहिल्यानगर पुरती मर्यादीत आहे. त्यामुळे सदर निविदांच्या संबंधीत सर्व न्यायप्रविष्ट प्रकरणे फक्त अहिल्यानगर न्यायालयाच्या कक्षेत राहतील.

५) सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

६) नमुद निविदा जर वजनावर असल्याचा उल्लेख केलेला असल्यास निविदाधारकाने नमुद दर हे किलोवर नमुद करावेत.

७) निविदात नमुद दरावर विक्रीकर वस्तु व सेवा कर (**GST**) नियमानुसार भरणे अनिवार्य आहे. नमुद दर आणि **GST** ची रक्कम मिळून येणा-या किंमतीवर शेकडा २ टक्के आयकर भरावा लागेल. निविदाधारकाचे (**GST**) जी.एस.टी. रजिस्ट्रेशन आवश्यक आहे.

सदर निविदा नुसार लिलावाद्वारे विक्री करणेसाठी समाविष्ट सर्व मोटारवाहने निरुपयोगी साहित्य ‘‘केडगांव देवी’’ नगरपुणे महामार्गावरील हॉटेल अर्चना पासुन केडगांव ते नेप्ती रस्ता येथील उपअभियंता (यांत्रिकी) कार्यशाळा, यांत्रिकी उपविभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर या कर्मशाळेत पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

प्रस्तुत लिलाव वाहने / यंत्रसामुग्री जशी आहे तशी व जेथे आहे तेथे या तत्वावर करणेत येणार आहे त्याबाबत नंतर कोणतेही म्हणणे ऐकूण घेतले जाणार नाही. जिल्हा परिषद कुठल्याही प्रकारचे देय रक्कम वाहन हस्तांतरणावेळी भरणार नाही. प्रादेशीक परिवहन कार्यालयाकडील सर्व प्रकारची देय रक्कम हे स्विकृत लिलावधारकाने/निविदाधारकाने भरावयाचे आहे, या अटीचे पालन करुनच जाहीर ई निविदेमध्ये सहभाग घ्यावयाचा आहे. त्यासंबंधी कुठल्याही प्रकारचे कायदेशीर / न्यायालयीन बाबीचा अधिकार लिलावधारकाला राहणार नाही.

८) निविदा प्रक्रिया सुरु असतांना जर एखादया वाहनाचा कालावधी १५ वर्षे पुर्ण झाला तर ती निविदा प्रक्रिया रद्द करण्यात येईल.

९) यंत्रसामुग्री बाबत अधिक माहितीसाठी उपअभियंता (यांत्रिकी), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे समक्ष संपर्क साधल्यास सविस्तर माहिती उपलब्ध केली जाईल. कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक (०२४१ – २३५४४७०)

## ८. **विलंब आकार :-**

१. ९० दिवस मुदतीत लिलाव मंजूर केलेली मोटार वाहने व मंजुर केलेली सर्व रक्कम भरुन तसेच वाहन मा. परिवहन अधिकारी यांचे कार्यालयाकडील भरणा करावयाचे सर्व रक्कम भरणा करुन वाहन हस्तांतरण करणे आवश्यक आहे. त्यानंतरच वाहने ताब्यात देण्यात येतील.

२. ३० दिवस मुदतीत लिलाव मंजुर केलेली वाहनाव्यतिरिक्त यंत्रसामग्री / अन्य सामुग्रीची मंजुर झालेली सर्व रक्कम भरून सामग्री ताब्यात न घेतल्यास त्यापुढील जास्तीत जास्त १५ दिवस वाढीव मुदतीपर्यंत प्रतिदिनी रु.१००/- या प्रमाणे दंडाची रक्कम भरावी लागेल.

३. वरिल प्रमाणे सदर वाढीव मुदतीत देखील संबंधिताने खरेदी केलेली मोटार वाहने / यंत्रसामुग्री न उचलल्यास त्या निविदाधारकाची जिल्हा परिषदेकडे भरलेली त्या लॉटची इसारा रक्कम जप्त केली जाईल त्यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. तदनंतर संबंधित लिलावधारकाचे कोणतेही म्हणणे विचारात घेतले जाणार नाही.

४. लिलावानुसार विकलेली मोटार वाहने / यंत्र सामुग्री व इतर सामुग्री कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत संबंधीत लिलाव मंजुर केलेल्या अधिकृत निविदाधारकाच्या ताब्यात देण्यात येतील. खरेदी केलेली सामुग्री / मोटारवाहने उचलून नेण्याचा खर्च संबंधीत लिलावदारास करावा लागेल.

५. लिलाव मंजूरीचा आदेश प्राप्त झालेल्या दिनांकापासून सदर सामुग्रीची जबाबदारी संबंधीत लिलावदाराची राहील त्यात काही कमी जास्त झाल्यास जिल्हा परिषद जबाबदार राहणार नाही.

६. कोणत्याही प्रकारचे कर उदा. जकातकर व इतर सर्व खर्च याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.

७. **वस्तु सेवा कर (GST) व इन्कमटॅक्स :-**

सोबतच्या निविदात नमूद केलेप्रमाणे निविदा अटी व शर्तीमधील नमुद अट क्र. ७/७ नुसार वस्तु सेवा कर (जी.एस.टी) व इन्कमटॅक्स ची रक्कम लिलावधारकास भरावी लागेल. त्याशिवाय लॉट ताब्यात देण्यात येणार नाही. कोणतेही सुट मिळण्याचे प्रमाणपत्र निविदाधारकास मिळणार नाही.

८. **वाहनाचे नोंदणी व कर पुस्तके – (आर.सी / टी.सी बुक):-** **नमुद निविदेमध्ये जर वाहनाचा समावेश असल्यास**

ज्या वाहनांचे आर.सी / टी.सी. बुक उपलब्ध आहे त्याचा उल्लेख दरपत्रकात करण्यात आलेला आहे. तो लॉट खरेदी करणा-या लिलावधारकास उपलब्ध आर.सी/टी.सी. बुक पुरविण्यात येईल. मात्र ज्या वाहनांचे पुस्तक उपलब्ध नाहीत त्यांबाबत फक्त प्रमाणपत्र देण्यात येईल. डुप्लीकेट आर.सी. / टी.सी बुक काढण्याची जबाबदारी संबंधीत मंजुर निविदाधारकाची राहील.

**वाहनांच्या किंमती व त्यावरील देय असलेले सर्व प्रकारचे कर, आर.टी.ओ. कर वाहन हस्तांतरणावेळी लागणारे सर्व प्रकारचे कराची रक्कम लिलावधारकाने / निविदाधारकाने लॉट मंजुर / स्विकृत झालेनंतर तात्काळ भरुन वाहन हस्तांतरण केलेनंतरच सदरचे वाहन ताब्यात देण्यात येईल**

तसेच पुरविण्यात आलेली ट्रान्सफर फॉर्म्स, आर.सी / टी.सी बुकातील नोंदी अद्यावत करण्याची कार्यवाही व त्यासाठीचा खर्च संबंधीतास करावा लागेल. त्याचप्रमाणे वाहन हस्तांतरणवेळी मा. प्रादेशीक परिवहन अधिकारी यांनी सदरच्या वाहनावर आकारण्यात आलेला सर्व प्रकारच्या कराची रक्कम (आहे त्या परिस्थितीत) संबंधीत स्विकृत लिलावधारकाने / निविदाधारकाने भरणे बंधनकारक आहे. जि.प. कुठल्याही प्रकारची रक्कम अदा करणार नाही. याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकुन घेण्यात येणार नाही. अंतीम अधिकारी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचा राहील.

९. खरेदी केलेली मोटार वाहनांची कागदपत्रे हस्तांतरण फॉर्म ताब्यात घेतल्यानंतर ती स्वतःचे नांवे करुन घेण्याची कार्यवाही खरेदीदाराला स्वखर्चाने ताबडतोब करावी लागेल. तसेच वाहन नांवावर झालेचा पुरावा म्हणुन जिल्हा परिषदेस त्याची सत्यप्रत त्वरित जमा करावी लागेल त्यासाठी कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार करण्यात येणार नाही व तेथुन पुढील सर्व कायदेशीर बाबीस संबंधित लिलाव ताब्यात घेणा-या लिलावदाराची जबाबदारी राहील. त्यानंतरच ई.एम.डी. इसारा (बयाणा) रक्कम परत केली जाईल.

१०.एखादया लिलावदाराने यापुर्वी जि.प. अ.नगरच्या लिलावप्रक्रियेत सहभागी होऊन त्यांनी ते वाहन प्रत्यक्ष ताब्यात घेतलेनंतर सदरचे वाहन स्वतःचे नांवावर करुन घेणे आवश्यक आहे, परंतु ज्या लिलावधारकांनी

यापुर्वी लिलावातुन वाहन खरेदी केलेले आहे परंतु स्वतःचे नांवावर करुन घेतलेले नाही अशा लिलावधारकांस या लिलावप्रक्रियेत सहभागी होता येणार नाही, सहभागी झाल्यास त्याची निविदा नाकारण्यात येईल.  नवीन लिलावप्रक्रियेत सहभागी होतांना त्यांनी मागील स्विकृत वाहन स्वतःचे नांवावर प्रादेशीक परिवहन कार्यालय कडुन केले बाबतचे रितसर दस्तावेज (वाहन नोंदणी पुस्तक) पुरावा म्हणुन जोडण्यात यावे.

११. उपरोक्त अटी व शर्ती शिथिलक्षम करण्याचा व कोणतीही अथवा सर्व निविदा स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अंतिम अधिकार मा. मु.का.अ. यांनी राखुन ठेवलेला आहे.

स्वाक्षरी/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद तथा,**
**अध्यक्ष लिलावसमिती, अहिल्यानगर**

---

वरील सर्व अटी व शर्ती आम्हास मान्य असून त्यांचे अधिन राहुन निरुपयोगी मोटार वाहने / यंत्रसामुग्रीचा लिलाव घेण्यास आम्ही तयार आहोत.

**दिनांकः -     /     /२०२६**                    **लिलावधारकाची सही व शिक्का**

---

## परिशिष्ट – १

## नमुना सत्यप्रतिज्ञापत्र (रु.५००/- च्या स्टँम्प पेपरवर)

## सत्यप्रतिज्ञापत्र (Affidavit)

मी ____________________ वय वर्षे ______ राहणार __________________या सत्यप्रतिज्ञा पत्राद्वारे लिहून देतो की, मी या फर्मचा/कंपनीचा मालक असून या कामासाठी निविदा सादर करीत आहे. त्या निविदेच्या लिफाफा क्र. १ मध्ये जी कागदपत्रे सादर केली आहेत ती खरी, बरोबर व पूर्ण आहेत, त्यामध्ये कोणत्याही त्रुटी, चुका नाहीत, याची मी खात्री केलेली असून असे शपथपूर्वक खालील अटी व शर्तीसह मान्य करीत आहे. या कागदपत्रांमध्ये काही चुकीची, दिशाभूल करणारी, खोटी व तसेच अपूर्ण माहिती आढळल्यास मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

१. मी, माझ्या कार्यालयाने किंवा माझ्या कर्मचा-यांनी जिल्हा परिषदेला कोणतीही खोटी माहिती किंवा देयकासमवेत तसेच पत्रव्यवहारात खोटी/बनावट कागदपत्रे सादर केली असल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

२. सदर निर्लेखन कार्यवाही निविदा दरम्यान कोणतेही कागदपत्रे खोटी/बनावट किंवा फसवी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

३. जर निर्लेखन कार्यवाही समाप्ती कालावधी दरम्यान किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे खोटी/बनावट, फसवी किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

४. निविदेतील सर्व अटीं व शर्तींना बांधील राहुन मी हे सत्यप्रतिज्ञापत्र लिहून देत आहे.

निविदाधारकाची सही / शिक्का

Signature Not Verified

Digitally signed by HITENDRA BHIMRAO CHAWHAN
Date: 2026.05.18 15:41:00 IST
Location: Maharashtra-MH